**भूसंपादन प्रारुप निवाड्यास पूर्वमान्यता देण्याकरीता उच्चस्तरीय समिती गठीत करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३१/भूसंपादन-४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक:- ३० जानेवारी, २०२६**

**वाचा:- शासन अधिसूचना क्र.एलक्यूएन-२०२२/प्र.क्र.८२/अ-२, दि.११.०१.२०२४.**

**प्रस्तावना :-**

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) कलम १०९ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम,२०१४ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ११२ अन्वये शासन अधिसुचना दि.११.०१.२०२४ नियम (१८) उप-नियम (३) नुसार भूसंपादन निवाड्यास मंजुरी प्रदान करणेकरीता वित्तीय मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत.

ज्या भूसंपादन प्रकरणी द्यावयाची भरपाईची रक्कम ही, शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल तर जिल्हाधिकारी, संबंधित महसुली विभागाच्या विभागीय आयुक्तांमार्फत प्रारूप निवाडा पूर्व मान्यतेस्तव राज्य शासनास सादर करील आणि राज्य शासनाची पूर्वमान्यता प्राप्त झाल्यानंतरच जिल्हाधिकारी निवाडा घोषित करील अशी तरतुद करण्यात आली आहे.

**०२.** या पार्श्वभूमीवर शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या प्रारुप निवाड्याच्या प्रस्तावाची जलदगतीने छाननी होवून गुणवत्तेवर निर्णय होण्यासाठी मा. अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन) यांच्या स्तरावर उच्चस्तरीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त नमूद प्रयोजनासाठी आता शासन मा.अपर मुख्य सचिव (वने,भूसंपादन) यांच्या अध्यक्षतेखाली प्रारुप निवाड्याच्या छाननीसाठी पुढील प्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत करीत आहे.

**समितीची संरचना :-**

| | |
|---|---|
| १) मा. अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन) | - अध्यक्ष |
| २) मा. अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) | - सदस्य |
| ३) मा. अपर मुख्य सचिव (कृषी) | - सदस्य |
| ४) मा. प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग) | - सदस्य |
| ५) मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (भूसंपादन मंडळाचे / प्रशासकीय विभाग प्रमुख) | - सदस्य |
| ६) मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक | - सदस्य |
| ७) मा. सहसंचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग | - सदस्य |

८) संबंधित जिल्हाधिकारी -सदस्य
९) मा.सह सचिव (भूसंपादन) - सदस्य सचिव

**०३.** प्रारुप भूसंपादन निवाड्याच्या छाननी/शासन अधिकारात करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल.

I. शासनस्तरावर प्राप्त होणाऱ्या प्रारूप मुल्यांकन निवाडयाची प्रचलित अधिनियम व नियम मधील तरतुदीनुसार छाननी करून शासनास मान्यतेसाठी शिफारस करणे.

II. तसेच प्रारूप भूसंपादन निवाडयातील जमिनी व्यतिरिक्त अन्य बाबींच्या मूल्यांकनासाठी संबंधित विषयातील सक्षम अधिकारी अथवा तज्ञ अधिकारी यांना विशेष निमंत्रित म्हणून बैठकीस आमंत्रित करता येईल.

III. विवक्षित प्रकरणी भूसंपादन प्रस्तावामधील संबंधित संपादन संस्थेचे प्रमुख यांना देखील आवश्यकतेनुसार निमंत्रित सदस्य म्हणून बैठकीस आमंत्रित करता येईल.

**०४.** उच्चस्तरीय समितीच्या शिफारसीनंतर शासन मान्यते अंती संबंधित जिल्हाधिकारी असा भूसंपादनाचा निवाडा जाहीर करणेची कार्यवाही करतील.

**०५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०१३०१६३२१८३५१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

SHEETAL HARISH BHINGARDIVE

Digitally signed by SHEETAL HARISH BHINGARDIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=811b70a9102967f853cc2b6ab33320a888d0446944cd32c5cbfea46ce603f707, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ABE1BF07925DA1BBAAACCA3C449FDCB0DFCA751E843E7D822224CFDBFE0D8669, cn=SHEETAL HARISH BHINGARDIVE
Date: 2026.01.30 16:33:33 +05'30'

**(शितल भिंगारदिवे)**
**सहायक संचालक, नगर रचना तथा**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. मा.अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. मा.अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. मा. अपर मुख्य सचिव (न.वि.१) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. मा. अपर मुख्य सचिव (न.वि.२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. मा.अपर मुख्य सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.मा.अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. मा.अपर मुख्य सचिव (कृषी) यांचे स्वीय सहायक, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.मा. प्रधान सचिव (विधी व न्याय) यांचे स्वीय सहायक, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८.मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
१९. मा. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
२०.सर्व विभागीय आयुक्त.
२१. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
२३.सर्व जिल्हाधिकारी.
२४. संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२५. सर्व सहसंचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग
२६. प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नागपूर.
२७. महाराष्ट्र विमानतळ विकास कॉर्पोरेशन लि., मुंबई
२८. सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा/ जलसंधारण)
२९.सर्व जिल्हा सरकारी वकील.
३०.निवडनस्ती (भूसंपादन-४)